## नगरविकास विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १३ जून २०१६

### अधिसूचना

**महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५.**

क्रमांक एमसीओ-२०१६/प्र.क्र.१२८(२)/नवि-१४.—ज्याअर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१६ (२०१६ चा महा. अध्या. ९/१६) अन्वये महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) यामध्ये सुधारणा करण्यात आली असून त्याद्वारे, नगरपरिषदेतील प्रत्येक प्रभागांमध्ये शक्य असेल तेथवर दोन मात्र, दोनपेक्षा कमी नाहीत आणि तीनपेक्षा अधिक होणार नाहीत इतके परिषद सदस्य निवडून देण्यात येतील अशी तरतूद करण्यात आलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त तरतुदी अंमलात आणण्याच्या उद्देशाने महिलांकरिता तसेच अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग यातील उमेदवारांकरिता परिषदेतील प्रभागांमध्ये सदस्यांच्या राखीव जागांचे वाटप करण्याचे आणि त्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्यासंबंधात नियम करणे इष्ट वाटते ;

आणि ज्याअर्थी, याबाबत तात्काळ कार्यवाही करण्यासाठी या नियमांची पूर्वप्रसिद्धीची शर्त काढून टाकणे, जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्र शासनाची खात्री पटली आहे.

त्याअर्थी, आता महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याच्या कलम १७ चे पोट-कलम (२) खंड (क्यू) आणि कलम ३२१ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि या संदर्भात त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून तसेच या संदर्भात अगोदर काढलेल्या, इतर सर्व अधिसूचना, आदेश, नियम, इत्यादींचे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासन, राज्य निवडणूक आयुक्तांशी विचारविनिमय केल्यानंतर, याद्वारे पुढील नियम करीत आहे, ते असे :—

१. **संक्षिप्त नाव.**—या नियमांना महाराष्ट्र नगर परिषदा (प्रभागांमध्ये राखीव जागांचे वाटप करणे आणि त्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्याची पद्धत) नियम, २०११ असे म्हणण्यात येईल.

२. **व्याख्या.**—(एक) या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,–

(अ) "अधिनियम" याचा अर्थ, महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. अध्या. ४०), असा आहे.

(ब) "प्रभाग" याचा अर्थ, परिषद सदस्यांना निवडून देण्याच्या प्रयोजनार्थ, परिषदेचे क्षेत्र ज्या प्रादेशिक मतदारसंघांमध्ये विभागलेले असेल त्यांच्यापैकी प्रादेशिक मतदारसंघ असा आहे.

(दोन) या नियमांमध्ये वापरलेले, परंतु याअगोदर व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना या अधिनियमामध्ये जो अर्थ नेमून दिलेला असेल तोच अर्थ असेल.

३. **अनुसूचित जातींसाठी राखून ठेवलेल्या जागांचे वाटप करण्याची व त्या चक्रानुक्रमे फिरविण्याची पद्धत.**—(१) अनुसूचित जातींच्या उमेदवारांसाठी परिषद सदस्यांच्या जागा राखून ठेवण्याकरिता, प्रथम प्रभागांची मांडणी ही, ज्या प्रभागातील अनुसूचित जातीच्या लोकसंख्येची टक्केवारी त्या प्रभागातील एकूण लोकसंख्येच्या तुलनेत सर्वाधिक असेल अशा प्रभागापासून सुरुवात करून, उतरत्या क्रमाने करण्यात येईल.

(२) जेथे अनुसूचित जातींच्या उमेदवारांसाठी राखून ठेवावयाच्या परिषद सदस्यांच्या जागांची संख्या, परिषदेतील प्रभागांच्या संख्येइतकी किंवा कमी असेल तेथे, प्रत्येक प्रभागातील एक जागा ही, अनुसूचित जातींच्या लोकसंख्येची टक्केवारी सर्वाधिक असलेल्या प्रभागापासून सुरुवात करून उतरत्या क्रमाने अनुसूचित जातींसाठी नेमून देण्यात येईल :

परंतु, परिषदेच्या सर्व प्रभागांमध्ये असे आरक्षण चक्रानुक्रमे फिरविले जाईपर्यंत, ज्या प्रभागात अनुसूचित जातींसाठी अशी कोणतीही जागा यापूर्वी राखून ठेवलेली नव्हती अशा प्रभागांकरिता, परिषदेच्या पुढील निवडणुकांमध्ये, शक्य होईल तेथवर, या पोट-नियमाखाली राखून ठेवलेल्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्यात येतील.

(३) जेथे अनुसूचित जातींच्या उमेदवारांसाठी राखून ठेवावयाच्या परिषद सदस्यांच्या जागांची संख्या ही, परिषदेतील प्रभागांच्या संख्येपेक्षा जास्त असेल तेथे,—

(अ) प्रथम, प्रत्येक प्रभागातील एक जागा अनुसूचित जातींसाठी नेमून देण्यात येईल; आणि

(ब) त्यानंतर, उर्वरित राखीव जागा नेमून देण्याच्या प्रयोजनासाठी, अनुसूचित जातींसाठी राखून ठेवावयाच्या सर्व जागा नेमून दिल्या जाईपर्यंत, अनुसूचित जातींच्या लोकसंख्येची टक्केवारी सर्वाधिक असलेल्या प्रभागापासून सुरुवात करून उतरत्या क्रमाने, प्रभागातील आणखी एक जागा, अनुसूचित जातींसाठी नेमून देण्यात येईल :

परंतु, परिषदेच्या सर्व प्रभागांमध्ये असे आरक्षण चक्रानुक्रमे फिरविले जाईपर्यंत, ज्या प्रभागात अनुसूचित जातींसाठी केवळ एकच जागा यापूर्वी राखून ठेवलेली होती अशा प्रभागांकरिता, परिषदेच्या पुढील निवडणुकांमध्ये, शक्य होईल तेथवर, या पोट-नियमाखाली राखून ठेवलेल्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्यात येतील.

**४. अनुसूचित जमातीसाठी राखून ठेवलेल्या जागांचे वाटप करण्याची व त्या चक्रानुक्रमे फिरविण्याची पद्धत.—**

(१) अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी परिषद सदस्यांच्या जागा राखून ठेवण्याकरिता, प्रथम प्रभागांची मांडणी ही, ज्या प्रभागातील अनुसूचित जमातींच्या लोकसंख्येची टक्केवारी त्या प्रभागातील एकूण लोकसंख्येच्या तुलनेत सर्वाधिक असेल अशा प्रभागापासून सुरुवात करून, उतरत्या क्रमाने करण्यात येईल.

(२) जेथे अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी राखून ठेवावयाच्या परिषद सदस्यांच्या जागांची संख्या, परिषदेतील प्रभागांच्या संख्येइतकी किंवा कमी असेल तेथे, प्रत्येक प्रभागातील एक जागा, ही अनुसूचित जमातींच्या लोकसंख्येची टक्केवारी सर्वाधिक असलेल्या प्रभागापासून सुरुवात करून उतरत्या क्रमाने अनुसूचित जमातींसाठी नेमून देण्यात येईल :

परंतु, परिषदेच्या सर्व प्रभागांमध्ये असे आरक्षण चक्रानुक्रमे फिरविले जाईपर्यंत, ज्या प्रभागात अनुसूचित जमातींसाठी अशी कोणतीही जागा यापूर्वी राखून ठेवलेली नव्हती अशा प्रभागांकरिता, परिषदेच्या पुढील निवडणुकांमध्ये, शक्य होईल तेथवर, या पोट-नियमाखाली राखून ठेवलेल्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्यात येतील.

(३) जेथे अनुसूचित जमातींच्या उमेदवारांसाठी राखून ठेवावयाच्या सदस्यांच्या जागांची संख्या ही, परिषदेतील प्रभागांच्या संख्येपेक्षा जास्त असेल तेथे,—

(अ) प्रथम, प्रत्येक प्रभागातील एक जागा अनुसूचित जमातींसाठी नेमून देण्यात येईल; आणि

(ब) त्यानंतर, उर्वरित राखीव जागा नेमून देण्याच्या प्रयोजनासाठी, अनुसूचित जमातींसाठी राखून ठेवावयाच्या सर्व जागा नेमून दिल्या जाईपर्यंत, अनुसूचित जमातींच्या लोकसंख्येची टक्केवारी सर्वाधिक असलेल्या प्रभागांपासून सुरुवात करून उतरत्याक्रमाने, प्रभागातील एक जागा, अनुसूचित जमातीसाठी नेमून देण्यात येईल :

परंतु परिषदेच्या सर्व प्रभागांमध्ये, असे आरक्षण चक्रानुक्रमे फिरविले जाईपर्यंत, ज्या प्रभागात अनुसूचित जमातींसाठी केवळ एकच जागा यापूर्वी राखून ठेवलेली होती अशा प्रभागांकरिता, परिषदेच्या पुढील निवडणुकांमध्ये, शक्य होईल तेथवर, या पोट-नियमाखाली राखून ठेवलेल्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्यात येतील.

**५. एकाच प्रभागामध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती या दोन्हींसाठी जागा आरक्षित होत असल्यास, अशा आरक्षित जागा वाटपाची पद्धत.—** अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीकरिता राखून ठेवावयाच्या परिषद सदस्यांच्या जागा नेमून देतेवेळी अनुसूचित जातींच्या जागा आणि अनुसूचित जमातींच्या जागा लोकसंख्येच्या टक्केवारीच्या आधारे जर एकाच प्रभागांमध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती या दोन्हींसाठी जागा आरक्षित होत असतील तर; त्या प्रभागातील जागा ही, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती या दोन प्रवर्गापैकी ज्या प्रवर्गाच्या लोकसंख्येची टक्केवारी अधिक असेल अशा प्रवर्गाकरिता राखून ठेवण्यात येईल.

**६. नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता जागांचे वाटप करण्याची पद्धत.—**(१) नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवारांकरिता राखून ठेवावयाच्या परिषद सदस्यांच्या जागा पुढे दिलेल्या पद्धतीने नेमून देण्यात येतील, ती अशी,

(अ) नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवारांकरिता राखून ठेवावयाच्या परिषद सदस्यांच्या जागांची संख्या ही, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्याकरिता जागा राखून ठेवलेले प्रभाग वगळून उर्वरित प्रभागांच्या संख्येइतकी अथवा कमी असेल तर,—

(एक) प्रथम जर त्याठीकाणी तीन सदस्यांचा प्रभाग असेल आणि त्या प्रभागातील जास्तीत जास्त एक जागा अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीकरिता राखून ठेवण्यात आली असेल तर त्या प्रभागामधील एक जागा नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता थेट नेमून देण्यात यावी.

(दोन) त्यानंतर अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्याकरिता एक जागा राखून ठेवलेले प्रभाग वगळून उर्वरित दोन सदस्यीय प्रभागांमधून सोडत काढून नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील एक जागा वाटण्यात यावी.

(ब) नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवारांकरिता राखून ठेवावयाच्या परिषद सदस्यांच्या जागेची संख्या ही, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्याकरिता जागा राखून ठेवलेले प्रभाग वगळून उर्वरित प्रभागांच्या संख्येपेक्षा जास्त असेल तर, —

(एक) पहिले असे की, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्याकरिता जागा राखून ठेवलेले प्रभाग वगळून उर्वरित प्रभागातील एक जागा नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता नेमून देण्यात येईल;

(दोन) दुसरे असे की, जर एका प्रभागात तीन जागा असतील आणि जास्तीत जास्त एक जागा अनुसूचित जातीकरिता किंवा अनुसूचित जमातींकरिता किंवा नागरिकांच्या मागास प्रवर्गाकरिता राखून ठेवलेली असेल तर, अशा प्रभागातील एक जागा थेट नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता नेमून देण्यात येईल;

(तीन) त्यानंतर नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता राखून ठेवावयाच्या उर्वरित जागा, कोणत्याही असतील तर, ज्या प्रभागांमध्ये एक जागा अनुसूचित जातींकरिता किंवा अनुसूचित जमातींकरिता राखून ठेवलेली असेल अशा दोन सदस्यीय प्रभागांमधून सोडतीने नेमून देण्यात येतील;

(चार) वरील खंड (एक), (दोन) व (तीन) अनुसार नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता जागांचे वाटप केल्यानंतरदेखील जर नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता राखीव असलेल्या काही जागा अजूनही शिल्लक राहात असतील तर, ज्या प्रभागांमध्ये किमान एक जागा कोणत्याही प्रवर्गासाठी राखून ठेवलेली नसेल अशा सर्व प्रभागांमधून सोडतीने नेमून देण्यात येतील.

(२) नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता अशाप्रकारे राखून ठेवलेल्या जागा, शक्य तेथवर, ज्या प्रभागांमध्ये अगोदरच्या निवडणुकांमध्ये नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता जागा राखून ठेवण्यात आली नव्हती, अशा प्रभागांमध्ये, जोपर्यंत असे आरक्षण चक्रानुक्रमे फिरविले जात नाही तोपर्यंत परिषदेच्या त्यानंतरच्या निवडणुकांमध्ये राखून ठेवण्यात येतील.

**७. महिलांसाठी जागा नेमून देण्याची पद्धत.**—(१) एखाद्या प्रभागात महिलांसाठी राखून ठेवावयाच्या परिषद सदस्यांच्या जागांची संख्या ही खालीलप्रमाणे असेल :—

(अ) दोन जागा असलेल्या प्रभागातील एक जागा ही महिलांसाठी राखून ठेवण्यात येईल.

(ब) तीन जागा असलेल्या प्रभागातील दोन जागा या, महिलांसाठी राखून ठेवण्यात येतील.

(२) कलम ९ च्या पोट-कलम (२) मधील खंड (ग) च्या परंतुकातील तरतुदींच्या अधीन राहून अनुसूचित जाती किंवा, यथास्थिती, अनुसूचित जमातीच्या महिलांसाठी राखून ठेवावयाच्या जागा, अनुसूचित जाती किंवा, यथास्थिती, अनुसूचित जमातींसाठी राखीव जागा असलेल्या प्रभागांमधून सोडतीने नेमून देण्यात येतील.

(३) नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील महिलांसाठी राखून ठेवावयाच्या जागा, अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातींच्या महिलांसाठी राखीव जागा असलेले प्रभाग वगळल्यानंतर, नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गासाठी राखीव जागा असलेल्या प्रभागांमधून सोडतीने नेमून देण्यात येतील.

(४) एकदा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागास प्रवर्गातील महिलांकरिता समुचित प्रभागांमध्ये जागा राखून ठेवण्यात आल्यानंतर महिलांकरिता राखीव असलेल्या उर्वरित जागा, ज्या प्रभागांमध्ये पोट नियम (१) च्या तरतुदीच्या अधीनतेने महिलांचे आरक्षण पूर्ण करण्याकरिता आवश्यक असतील त्या मर्यादेपर्यंत नेमून देण्यात येतील.

(५) सर्व प्रभागांमध्ये असे आरक्षण चक्रानुक्रमे फिरविले जाईपर्यंत, परिषदेच्या यापूर्वीच्या निवडणुकांमध्ये एखाद्या विशिष्ट प्रवर्गातील महिलांसाठी जेथे अशी कोणतीही जागा नेमून देण्यात आली नव्हती त्या प्रभागांसाठी, या नियमांच्या प्रारंभानंतरच्या परिषदेच्या पुढील निवडणुकीमध्ये, शक्य असेल तेथवर, त्या प्रवर्गातील महिलांसाठी राखीव जागा चक्रानुक्रमे फिरविण्यात येतील.

**स्पष्टीकरण.**— हा नियम आणि नियम ३, ४ व ६ यानुसार चक्रानुक्रमाच्या प्रयोजनांसाठी, या नियमांच्या प्रारंभानंतर घेतलेल्या सार्वत्रिक निवडणुका ह्या, पहिली निवडणूक असल्याचे मानण्यात येईल.

**८. सर्वसाधारण तरतूद.—** जेथे, ज्या प्रभागांमध्ये, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा नागरिकांच्या मागास प्रवर्गाकरिता जागांचे वाटप करताना ५० टक्क्यांपेक्षा जास्त जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत, तेथे नंतरच्या निवडणुकीमध्ये, शक्यतोवर, अशा जागा नगरपरिषदेच्या इतर प्रभागांमध्ये चक्रानुक्रमे फिरविण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ज. ना. पाटील,**
शासनाचे उप सचिव.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 13th June 2016

*NOTIFICATION*

THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

No.MCO-2016/C.R.128(2)/UD-14.—Whereas, by the Maharashtra Municipal Corporations and the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships (Amendment) Ordinance, 2016 (Mah. Ord. IX of 2016), the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965 (Mah. XL of 1965) has been amended to provide that each of the wards in the Councils shall elect, as far as possible, two Councillors but not more than three Councillors;

And Whereas, to give effect to the said provisions, it is considered expedient to frame the rules regarding the manner of allotment and rotation of reservation of seats of Councillors in wards in the Councils for women and the candidates belonging to the Scheduled Castes, Scheduled Tribes and Backward Class of Citizens;

And Whereas, the Government of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary to take immediate action in this behalf by dispensing with the condition of previous publication of these rules.

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (q) of sub-section *(2)* of section 17 read with section 321 of the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965 (Mah. XL of 1965), and of all other powers enabling it in that behalf, and in supersession of all earlier notifications, orders, rules, etc., issued previously in this behalf, the Government of Maharashtra, after consultation with the State Election Commissioner, hereby makes the following rules, namely:–

1. *Short title*.—These rules may be called the Maharashtra Municipal Councils (Manner of Allotment and Rotation of Reservation of Seats of Councillors in wards) Rules, 2016.

2. *Definitions*.—*(1)* In these rules, unless the context otherwise requires,–

(*a*) "Act" means the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965 (Mah. XL of 1965);

(*b*) "Ward" means the territorial constituencies into which the area of the Council is divided for the purpose of electing Councillors.

*(2)* Words and expressions used in these rules but not defined hereinabove shall have the same meanings as respectively assigned to them in the Act.

3. *Manner of allotment and rotation of seats reserved for the Scheduled Castes*.—*(1)* For reserving seats of Councillors for the candidates belonging to the Scheduled Castes, the wards shall be first arranged in descending order, beginning with a ward where the percentage of population of the Scheduled Castes with regard to the total population of such ward is the highest.

*(2)* Where the number of seats of Councillors to be reserved for the candidates belonging to the Scheduled Castes is equal to or less than the number of wards in a Council, one seat in each ward shall be allotted to the Scheduled Castes, beginning in the descending order with the ward having the highest percentage of population of the Scheduled Castes :

Provided that, the seats reserved under this sub-rule shall be rotated, as far as possible, in the subsequent elections to the Council to such wards in which no such seat had been previously reserved for the Scheduled Castes until such reservation is provided in all the wards in the Council by rotation.

(*3*) Where the number of seats of Councillors to be reserved for the candidates belonging to the Scheduled Castes is more than the number of wards in the Council, then,—

(*a*) firstly, one seat in each ward shall be allotted to the Scheduled Castes ; and

(*b*) thereafter, for the purpose of allotting the remaining reserved seats, beginning in the descending order with the ward having the highest percentage of population of the Scheduled Castes, one seat in the ward, shall be allotted to the Scheduled Castes till all the seats to be reserved for the Scheduled Castes are allotted :

Provided that, the seats reserved under this sub-rule shall be rotated, as far as possible, in the subsequent elections to the Council to such wards in which one such seat had been previously reserved for Scheduled Castes, until such reservation is provided in all the wards in the Council by rotation.

4. *Manner of allotment and rotation of seats reserved for the Scheduled Tribes.*—(*1*) For reserving seats of Councillors for the candidates belonging to the Scheduled Tribes, the wards shall be first arranged in descending order beginning with a ward where the percentage of population of the Scheduled Tribes with regard to the total population of such ward is the highest.

(*2*) Where the number of seats of Councillors to be reserved for the candidates belonging to the Scheduled Tribes is equal to or less than the number of wards in a Council, one seat in each ward shall be allotted to the Scheduled Tribes, beginning in the descending order, with the ward having the highest percentage of population of the Scheduled Tribes :

Provided that, the seats reserved under this sub-rule shall be rotated, as far as possible, in the subsequent elections to the Council to such wards in which no such seat had been previously reserved for the Scheduled Tribes until such reservation is provided in all the wards in the Council by rotation.

(3) Where the number of seats of Councillors to be reserved for the candidates belonging to the Scheduled Tribes, is more than the number of wards in a Council, then,—

(*a*) firstly, one seat in each ward shall be allotted to the Scheduled Tribes ; and

(*b*) thereafter, for the purpose of allotting the remaining reserved seats, beginning in the descending order with the ward having the highest percentage of population of the Scheduled Tribes, one seat in the ward, shall be allotted to the Scheduled Tribes till all the seats to be reserved for the Scheduled Tribes are allotted :

Provided that, the seats reserved under this sub-rule shall be rotated, as far as possible, in the subsequent elections to the Council to such wards in which one such seat had been previously reserved for Scheduled Tribes, until such reservation is provided in all the wards in the Council by rotation.

5. *Manner of reservation, where the seat in the ward may be allotted to both, Scheduled Castes and Scheduled Tribes.*—While allotting the seats of Councillors to be reserved for the Scheduled Castes or the Scheduled Tribes, if on the basis of the percentage of population of the Scheduled Castes and the Scheduled Tribes, the same ward qualifies for reservation of seats for both, the Scheduled Castes and the Scheduled Tribes, then a seat in such ward shall be reserved for either of the two categories *viz.* the Scheduled Castes or the Scheduled Tribes, depending on whose percentage of population is higher in that ward.

6. *Manner of allotment of seats for the Backward Class of Citizens.*—(*1*) The seats of Councillors to be reserved for the candidates belonging to the Backward Class of Citizens shall be allotted to the wards in the following manner, namely :—

(*a*) Where the number of seats of Councillors to be reserved for the candidates belonging to the Backward Class of Citizens is less than the number of wards remaining after excluding the wards having seats reserved for the Scheduled Castes and Scheduled Tribes, then,—

*Explanation.*—For the purpose of rotation under this rule and rules 3, 4 and 6, the general elections held after commencement of these rules shall be considered as the first election.

8. *General Provisions.*—Where, while allotting the seats to the Scheduled Castes, Scheduled Tribes or Backward Class of citizens, more than fifty per cent of the seats in a ward are reserved, then endeavor shall be made, in subsequent election, to rotate such seats in other wards of the Council.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

J. N. PATIL,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

(*i*) firstly if there is a ward with three seats and at the most one seat is reserved for the Scheduled Castes or the Scheduled Tribes, one seat for the Backward Class of Citizens shall be allotted directly to that ward ; and

(*ii*) thereafter, one seat shall be allotted to the Backward Class of Citizens in every ward selected by draw of lots from amongst the remaining wards having two seats excluding the wards having seats reserved for the Scheduled Caste and the Scheduled Tribes.

(*b*) Where the number of seats to be reserved for the candidates belonging to the Backward Class of Citizens is more than the number of wards remaining, after excluding the wards having seats reserved for the Scheduled Castes and Scheduled Tribes, then,—

(*i*) firstly, one seat in each ward excluding the wards having seats reserved for the Scheduled Castes and Scheduled Tribes shall be allotted for the Backward Class of Citizens ;

(*ii*) secondly, where there is a ward of three seats and where in all one seat is reserved for the Scheduled Castes or the Scheduled Tribes or the Backward Class of Citizens, then one seat in such ward shall be directly allotted to the Backward Class of Citizens ;

(*iii*) thereafter, the remaining seats, if any, to be reserved for the Backward Class of Citizens shall be allotted by drawing of lots from amongst the wards having two seats where one seat is reserved for the Scheduled Castes or the Scheduled Tribes ;

(*iv*) if even after allocation of seats for the Backward Class of Citizens as per clauses (i), (ii) and (iii), some seats still remain to be reserved for the Backward Class of Citizens, then the same shall be allotted by draw of lots from amongst all such wards where at least one seat is not reserved for any category.

(2) The seats so reserved for the Backward Class of Citizens shall be rotated, as far as possible, in the subsequent elections to the Council to such wards in which no seat had been reserved in the previous elections for the Backward Class of Citizens until such reservation is given by rotation in each of the wards in the Council.

7. *Manner of allotment of seats for women.*—(*1*) The number of seats of Councillors to be reserved for women in a ward shall be as under :—

(*a*) In a ward having two seats, one seat shall be reserved for women.

(*b*) In a ward having three seats, two seats shall be reserved for women.

(2) Subject to the provisions of the proviso to clause (c) of sub-section *(2)* of section 9, the seats to be reserved for women belonging to the Scheduled Castes or, as the case may be, the Scheduled Tribes, shall be allotted by drawing of lots from amongst the wards having the seats reserved for the Scheduled Castes or, as the case may be, the Scheduled Tribes.

(*3*) The seats to be reserved for women belonging to the Backward Class of Citizens shall be allotted by drawing of lots from amongst the wards having the seats reserved for the Backward Class of Citizens after excluding the wards having a seat reserved for women belonging to the Scheduled Castes or the Scheduled Tribes.

(*4*) Once the seats are reserved in the appropriate wards for the woman belonging to the Scheduled Castes, Scheduled Tribes and the Backward Class of Citizens, then the remaining seats reserved for the women shall be allotted in various wards up to the numerical limit prescribed for such reservation under sub-rule *(1)*.

(*5*) The seats reserved for the women in a particular category shall be allotted by rotation, as far as possible, in the subsequent election of the Council after commencement of these rules, to the wards where no such seat was allotted to women in that category in the previous elections to the Council, till all the wards are allotted such reservation by rotation.